# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गो.वि.ग./कुसका/ 00664 /२०२० दिनांक : 13/०७/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– सन २०१९–२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :– १) शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र./उशिसं/शिष्य२०१९–२०/डीबीटी/४६२४ दि. ०७/०७/२०२०

२) महाआयटी कार्यालयाचा दि. ०७/०७/२०२० रोजीचा ईमेल.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनेबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून संदर्भ क्र. १ पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने महाडीबीटी कार्यालयाच्या संदर्भ क्र. २ नुसार, सन २०१९–२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १७ जुलै, २०२० आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. २३ जुलै, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ उपलब्ध होणार नाही. तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

करीता सदरहुबाबत दिलेल्या मुदतीत महाविद्यालयाने प्रलंबित अर्ज निकाली काढावेत. तद्नंतर महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जाच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील. कृपया याची नोंद घ्यावी.

संलग्नः– वरीलप्रमाणे.

13/7/2020

(डॉ. ए. झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य २०१९-२०/डीबीटी/ ७८२७ दि. ७.०७.२०२०
तात्काळ ईमेलद्वारा

6944 8/7/2020
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 1341 दिनांक 8/7/2020
जावक क्र. .......... दिनांक ..........

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- महाआयटी कार्यालयाचा दि. ७.०७.२०२० रोजीचा इमेल.

राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची विहीत कालावधीमध्ये पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळोवेळी मुदतवाढ देऊनही, दि. ०६.०७.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण ५,३२१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर तसेच ३११ विद्यार्थ्यांचे अर्ज विभाग स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तसेच कोरोना विषाणू (कोविड १९) मुळे उद्भवलेली राज्यातील वास्तविक परिस्थिती विचारात घेऊन विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालय व विभागस्तरावर प्रलंबित अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार, महाआयटी कार्यालयाच्या संदर्भिय इमेलनुसार, सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १७ जूलै, २०२० आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. २३ जूलै, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ उपलब्ध होणार नाही. तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

त्यामुळे आपल्या विभागामधील ज्या महाविद्यालयांच्या स्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत, अशा महाविद्यालयांचा आढावा घेऊन महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित अर्ज मुदतीमध्ये निकाली काढणेबाबत तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच दिलेल्या मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठाच्या बाबतीत संबंधित कुलसचिव तसेच विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत संबंधित विभागीय सहसंचालक जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

महाविद्यालयीन विभाग
परिपत्रक निर्गमित करून सूचना द्याव्यात

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :-१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.



7/7/2020
8/7/20

.nail schol.dhepune@gov.in

**Regarding Scrutiny Extension DBT Portal A.Y. 19 20**

**From :** Mandar Kulkarni <Mandar.Kulkarni@mahait.org> Tue, Jul 07, 2020 02:25 PM
**Subject :** Regarding Scrutiny Extension DBT Portal A.Y. 19 20
**To :** DHE Pune scholarship <schol.dhepune@gov.in>, Archana Borhade <archana.borhade70@gov.in>, desk18@dtemaharashtra.gov.in
**Cc :** sundar bulani <sundar.bulani@dtemaharashtra.gov.in>, SANJAYAUDUMBARDHARURKAR SECTIONOFFICER <sanjay.dharurkar@nic.in>, Yashwant Sawant <Yashwant.Sawant@mahait.org>, Uday Gawade <Uday.Gawade@mahait.org>

Dear Sir/Madam,

As per requests received from various departments, we've extended the following dates

Institute scrutiny Merit Schemes - 17th July 2020
Institute scrutiny Other Schemes 1st installment - 17th July 2020
Department scrutiny Merit Schemes - 23rd July 2020
Department scrutiny Other Schemes 1st installment- 23rd July 2020

**Please Note: Dates displayed on the portal will be updated soon.**

Regards,

Mandar Kulkarni
Consultant
Maharashtra Information Technology Corporation
(A Govt. of Maharashtra Enterprise)

Mail to: mandar.kulkarni@mahait.org
Tel. No. +91 86577 64197
Website: https://www.mahait.org

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य २०१९-२०/डीबीटी /४६२५ दि.०७/०७/२०२०

तात्काळ /अत्यंत महत्वाचे

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
२. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

**विषय :- सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ :- महाआयटी कार्यालयाचा दि. ७.०७.२०२० रोजीचा इमेल.

राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची विहीत कालावधीमध्ये पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळोवेळी मुदतवाढ देऊनही, दि. ०६.०७.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण ५,३२१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर तसेच ३११ विद्यार्थ्यांचे अर्ज विभाग स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तसेच कोरोना विषाणू (कोविड १९) मुळे उद्भवलेली राज्यातील वास्तविक परिस्थिती विचारात घेऊन विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालय व विभागस्तराव प्रलंबित अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार, महाआयटी कार्यालयाच्या संदर्भिय इमेलनुसार, <u>सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १७ जूलै, २०२० आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. २३ जूलै, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.</u> महाविद्यालय स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

तरी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय /संस्था/ विद्यापीठाच्या स्तरावर प्रलंबित राहणार नाहीत. याची दक्षता घ्यावी. दिलेल्या मुदतीनंतर अर्ज प्रलंबित राहील्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास याबाबत सर्वस्वी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य / विद्यापीठांचे कुलसचिव जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.